# बृहन्मुंबई महानगरपालिका
## जाहिरात

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अंतर्गत सार्वजनिक आरोग्य खाते व प्रमुख वैद्यकिय अधिक्षक व खाते प्रमुख (माध्यमिक आरोग्य सेवा) यांच्या आस्थापनेवरील **'कनिष्ठ भौतिकोपचार तज्ञ / भौतिकोपचार तज्ञ'** या संवर्गातील खालील तक्त्यात नमूद केलेली रिक्त पदे भरावयाची आहेत. अर्हता व अटींची पूर्तता करणा-या इच्छुक उमेदवारांकडुन दि.28.12.2022 ते दि.17.01.2023 या कालावधीत अर्ज मागविण्यात येत आहेत

**एकूण पदे -18**

| कप्पीकृत आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आदुघ | एकूण मावक | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण आरक्षण | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 1 | 1 | 7 | 6 | 13 |
| महिला 30 % | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 3 | 2 | 5 |
| अनाथ 1 % | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकूण** | 1 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 2 | 2 | 10 | 8 | 18 |

| | |
|---|---|
| 4 % प्रमाणे दिव्यांगाकरिता आरक्षण | दिव्यांग उमेदवारांकरिता एकूण 1 पद आरक्षित होत असून सदर पद खालील दिव्यांग प्रकारातून घेण्यात येतील<br>a) B (Blind) अंध , LV (Low Vision) अल्पदृष्टी |

| पदनाम | सदर पदाची जबाबदारी व कर्तव्य | शारिरीक पात्रता |
|---|---|---|
| **'कनिष्ठ भौतिकोपचार तज्ञ / भौतिकोपचार तज्ञ'** | The management of patients in terms of treatment to the patient (Psychiatry, Neurology, Paediatrics and Surgery, Orthopedics, OPD) devoting whole time and attention to the duties entrusted to the employee by H.O.D., Superiors or Dean as the case may be. | S- Sitting (बसणे)<br>ST- Standing (उभे राहणे)<br>W- Walking (चालणे)<br>BN – Bending (वाकणे)<br>MF- Manipulation with Fingers (बोटाद्वारे हाताळणी)<br>RW- Reading & Writing (वाचणे व लिहिणे)<br>SE- Seeing (बघणे)<br>H- Hearing (ऐकणे)<br>C- Communication (संवाद साधणे) |

**(अ) शैक्षणिक अर्हता** :

1.उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा B.Sc.(PT) (बी.एस.सी. (भौतिकोपचार) / B.P.Th. (बॅचलर ऑफ फीजीओथेरपी) पदवीधारक असावा.

2. उमेदवार महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, मुंबई येथे नोंदणीकृत असावा.

3. उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

4. उमेदवार ''डी.ओ.ई.ए.सी.सोसायटीचे''''सी.सी.सी.'' किंवा ''ओ स्तर '' किंवा ''ए स्तर'' किंवा ''बी स्तर'' किंवा ''सी स्तर'' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण मंडळाचे एमएससीआयटी किंवा जीईसीटीचे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी /वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. किंवा नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीत उपरोक्त संगणक अर्हता प्राप्त करणे आवश्यक आहे अन्यथा त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

**(ब) वयोमर्यादा** :

अगोदरच मनपाच्या सेवेत नसल्यास उमदेवाराचे वय दि. 28.12.2022 रोजी खुल्या प्रवर्गासाठी 38 वर्षापेक्षा जास्त असता कामा नये (मागासवर्गीय उमदेवारांच्या बाबतीत वयोमर्यादा 43 वर्षापेक्षा अधिक असता कामा नये व दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत कमाल 45 वर्षे असावे. ) अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेमध्ये असल्यास उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा नाही. (शासन निर्णयानुसार वेळोवेळी होणारे बदल अंमलात आणण्यात येतील.)

**(क)वेतनश्रेणी** :-

सातव्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर- M-21 रु. 35400 - 112400 अधिक नेहमीचे अनुज्ञेय भत्ते.

**निवडीचे निकष**:

पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार विहित केलेली अर्हता /अटी /शर्त्ती धारण करीत असलेल्या उमेदवारांमधून मान्यताप्राप्त विद्यापीठाची B.Sc. (PT) (बी.एस.सी. (भौतिकोपचारतज्ञ)) / B.P.Th. (बॅचलर ऑफ फीजीओथेरपी) अंतिम वर्षाच्या पदवी परीक्षेतील प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे उच्च गुणवत्ता धारक उमदेवारांची निवड करण्यांत येईल.

उमेदवारांनी अंतिम पदवी परीक्षा दुसऱ्या किंवा तिसऱ्या प्रयत्नांत उत्तीर्ण केली असल्यास पदवी परीक्षेत मिळविलेल्या गुणांमधून अनुक्रमे 1% व 2 % गुण वजा केले जातील. अंतिम पदवी परीक्षा 3 पेक्षा जास्त प्रयत्नांत उत्तीर्ण केलेल्या उमेदवारांचा भौतिकोपचार तज्ञ / कनिष्ठ भौतिकोपचार तज्ञ पदासाठी विचार केला जाणार नाही. गुणांच्या टक्केवारीचे परिगणन केल्यानंतर दोन किंवा अधिक उमेदवारांच्या गुणांची टक्केवारी समान झाल्यास उमेदवारांच्या जन्म दिनांकापासून वयोजेष्ठतेनुसार प्राधान्यक्रम देण्यांत येईल. (किंवा त्यांच्या आडनावाच्या अदयाक्षरानुसार निश्चित करण्यात येईल.)

**निवडीची कार्यपध्दती:-**

1. सर्व प्रवर्गातील उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची खुल्या प्रवर्गाचे उमेदवार म्हणून निवड करण्यात येईल. मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गामध्ये भरतीकरिता अर्ज करण्याची मुभा राहील.
2. उच्च गुणवत्ताधारक मागासवर्गाच्या उमेदवारांची सामाईक गुणवत्ता यादीनुसार खुल्या पदावर निवड झालेली असेल अशा उमेदवारांची खुल्या पदावर नेमणूक करण्यात येईल.
3. भरती प्रक्रिया पूर्ण झाल्यावर सामाईक गुणवत्ता यादी (Combine Merit List) प्रसिध्द करण्यांत येईल.

विहित अर्हता धारण करणा-या उमेदवारांनी विहित नमुन्यातील वैयक्तिक माहितीपत्रासह (Bio-Data) व सर्व प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती व साक्षांकित छायांकित प्रतींसह खालील वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या ठिकाणी व दिनांकास निवड प्रक्रियेसाठी उपस्थित रहाणे आवश्यक आहे.टपालाव्दारे आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

**अ) <u>गुणांची आवश्यक टक्केवारी:-</u> खुल्या प्रवर्गासाठी उमेदवाराने B.Sc.(PT) (बी.एस.सी. (भौतिकोपचार) / B.P.Th. (बॅचलर ऑफ फीजीओथेरपी) पदवी परीक्षेच्या अंतिम वर्षात किमान 50% किंवा अधिक टक्केवारी प्राप्त केलेली असावी. मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी सदर टक्केवारी किमान 45% इतकी असावी**

**ब) वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १. | अर्ज सादर करण्याचा कालावधी | दि 28.12.2022 ते दि. 17.01.2023<br>कार्यालयीन वेळेत सकाळी **10.00** ते संध्याकाळी **5.00** पर्यंत अर्ज सादर करावा. **(**शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टी चा दिवस वगळून **)**<br>त्यानंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. |
| २. | अर्ज सादर करण्याचे तसेच मूळ प्रमाणपत्रे पडताळणीचे ठिकाण | प्रमुख वैदयकीय अधिक्षक व खाते प्रमुख (माध्यमिक आरोग्य सेवा) यांचे कार्यालय,<br>के.बी.भाभा मनपा सर्वसाधारण रुग्णालय, बांद्रा (प.),<br>07 वा मजला, डॉ.आर.के. पाटकर मार्ग, मुंबई 400050 |
| ३ | मूळ प्रमाणपत्रे पडताळणीसाठी हजर राहण्याचा कालावधी | दि.27.02.2023 ते दि.07.03.2023<br>कार्यालयीन वेळेत सकाळी **11.00** ते संध्याकाळी **4.00** पर्यंत **(**शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीचा दिवस वगळून **)** |

वरील वेळापत्रकात आवश्यकता भासल्यास योग्य ते बदल प्रशासनाकडून करण्यात येतील.आवश्यकता भासल्यास भरती प्रक्रिया महापालिका प्रशासनाकडून कधीही थांबविली किंवा पुढे ढकलली जाऊ शकते.

**<u>सर्वसाधारण अटी</u>**

1. रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार गुणवत्ता यादीतून उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांच्या नेमणुका करण्यात येतील. तथापि, निवड यादी कोणत्याही वेळी पूर्व सूचना न देता रद्द करण्याचे अधिकार मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.
2. जाहिरातीद्वारे दिलेल्या पदांची संख्या आणि अनुशेष बदलण्यासापेक्ष आहे.
3. वैयक्तिक माहितीपत्रक(**Bio-Data**)विहित नमुन्यात स्वहस्ताक्षरात, सर्व दृष्टीने परिपूर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण वैयक्तिक माहितीपत्र विचारात घेतले जाणार नाहीत.
4. अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या एखाद्या कर्मचा-याला वर नमूद केलेल्या पदाकरीता अर्ज करावयाचा असेल तर त्याने/ तिने त्याच्या/ तिच्या खातेप्रमुखाने दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' आणावे.
5. अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्याच्या स्वाक्षरीसह वैयक्तिक माहितीपत्रावर(**Bio-Data**) नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. त्याच छायाचित्राच्या चार अतिरिक्त प्रती पुढील निवड प्रक्रियेसाठी उमेदवाराजवळ ठेवणे आवश्यक आहे.
6. वैयक्तिक माहितीपत्रासाठी वापरण्यात येणारे कागद चांगल्या प्रतीचा तसेच A4 साईझ मधील असावा.
7. उमेदवारांनी स्वत: निश्चित करावयाचे आहे की ते आवेदित पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात.

8. **पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पूर्ण असावा.**
9. **इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरीता विचार केला जाणार नाही.**
10. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्याने / तिने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.
11. उमेदवारांनी शाळा सोडल्याचा दाखला/जन्म दाखला /अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्र,व्यावसायिक अर्हता, सबंधित गुणपत्रिका, सक्षम अधिका-यांनी दिलेले जात प्रमाणपत्र,सक्षम अधिका-यांनी दिलेले जात वैधता प्रमाणपत्र, असल्यास अनुभवाचे प्रमाणपत्र, इ. यांच्या मूळप्रती व साक्षांकित छायाप्रतींसह उपस्थित रहावे. तसेच सदर प्रमाणपत्रांच्या साक्षांक्ति छायाप्रती वैयक्तिक माहितीपत्रासोबत(Bio-Data)जोडणे आवश्यक आहे. विवाहित महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावांत बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करावे.तसेच ते नसल्यास विवाहित महिला विवाहापूर्वीच्या नावांने अर्ज करू शकतात. **उमेदवार एका पेक्षा अधिक प्रयत्नात पदवी/पदविका उत्तीर्ण झाला असल्यास सर्व प्रयत्नांच्या गुणपत्रिका सोबत जोडणे आवश्यक आहे.** अन्यथा त्या उमेदवाराचा निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
12. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे. निवडीनंतर त्याबाबत माहिती झाल्यास त्याला / तिला सेवेतून काढून टाकण्यात येईल.
13. निवड झालेल्या उमेदवाराची संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी सदर पदाच्या एका महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल किंवा तशा अर्थाचे (आशयाचे) बंधपत्र (Surety Bond) सादर करावे लागेल. सदर अनामत रक्कम भरुन सुध्दा मुंबई महानगरपालिकेमध्ये नेमणूक न स्विकारल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधीत नोकरी सोडल्यास किंवा काही कारणास्तव बडतर्फ केल्यास त्यांना भरलेली अनामत रक्कम परत मिळण्याचा हक्क रहाणार नाही.
14. उमेदवारांना निवडीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
15. निवड झालेल्या उमेदवारांची मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही रुग्णालयात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महानगरपालिकेच्या कोणत्याही रुग्णालयात बदली योग्य असेल.
16. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
17. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची साक्षांक्ति छायांकीत प्रत वैयक्तिक माहितीपत्रासोबत जोडणे आवश्यक आहे.
18. सदर भरती अंतर्गत नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल व तीन वर्षानंतरचे सेवा सातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.
19. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा नियम,1989 तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा(वर्तणूक) नियम 1999 लागू होतील.
20. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर नविन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू होईल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजेच मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम (1953)आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाहनिधी योजना लागू होणार नाही.
21. शासन अधिसूचना दि. 28.03.2005 व त्याअनुषंगाने शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही/2000/प्रक(17/2000) / बारा दि. 01.07.2005 अन्वये लहान कुटुंब असल्याबाबतचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. (अविवाहित अर्जदाराने सुध्दा सदरचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये त्याने / तिने लागू नाही असा शेरा नमूद करावा.)

22. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस स्टेशनकडून प्राप्त झाल्यानंतरच उमेदवाराची संबंधित पदावर नियुक्ती केली जाईल.
23. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महापालिकेचे निवासस्थान उपलब्ध करून देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही.
24. विजा (अ), भज (ब), भज (क), भज (ड) या प्रवर्गाकरिता विहित केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय आहे.
25. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य प्रवर्गातील उमेदवार तसेच महिला आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी ते उन्नत आणि प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे नवीनतम प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
26. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या शासन परिपत्रक क्र.बीसीसी/2011/प्र.क्र./1064/11/16ब दि. 12.12.2011 (परिपत्रक क्र. एमबीसी/7100 दि.31.01.2012)नुसार मागासवर्गीयांच्या आरक्षित पदावर निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवाराने त्याचे जात वैधता प्रमाणपत्र नियुक्ती दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीत सादर करणे आवश्यक आहे. जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास निवड झाल्यानंतर सर्व कागदपत्रे पडताळणीसाठी संबंधित पडताळणी समितीकडे सादर करुन त्याची पोचपावती सादर करणे आवश्यक आहे. पोचपावती सादर न केल्यास तसेच त्यानी सादर केलेले जात प्रमाणपत्र संबंधित जात पडताळणी समितीने अवैध ठरविल्याचे कळविण्यात आल्यास त्याक्षणी त्यांना कोणतीही सूचना न देता / त्यांच्या विरुध्द कोणतीही खात्यांतर्गत चौकशी न करता त्यांचे नियुक्तीचे आदेश त्वरित रद्द करण्यात येतील.
27. अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असल्यास व जातीचा फायदा घेतलेला असल्यास जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
28. नि:समर्थ व्यक्तींनी उमेदवाराने किमान 40 टक्के अपंगत्व असल्याबाबतचे सक्षम प्राधिका-यांनी दिलेले प्रमाणपत्र व त्याची प्रत सोबत जोडावी.
29. शासकीय सक्षम प्राधिका-यांकडून किमान ४० टक्के दिव्यांग (नि:समर्थ) असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेल्या व निवड झालेल्या दिव्यांग उमदेवारांना मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडे पाठविले जाईल व मुंबई महानगरपालिका वैद्यकीय मंडळाने सदर दिव्यांग उमदेवार कनिष्ठ भौतिकोपचार तज्ञ / भौतिकोपचार तज्ञ पदाचे कर्तव्य बजावण्यास अपंगत्वाच्या दृष्टीकोनातून शारीरिकदृष्टया पात्र ठरविल्यानंतर त्यास प्रत्यक्ष नेमणूक देण्यात येईल.
30. महिलांचे आरक्षण महिला व बालकल्याण विभागाच्या शा.नि.क.82/2001/मएसा/2000/प्रक 415/ का-2 दिनांक 25 मे 2001 मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.
31. इतर मागास प्रवर्गासाठी राखीव असलेल्या पदांवर नियुक्तीसाठी अर्ज करणा-या उमेदवारांकडे दि. 31.03.2023 पर्यंत वैध असलेले नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र असावे.
32. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवारांकरीता शासन निर्णय क्र.राआधो 4019 /प्र.क्र. 31/ 16 -अ, दि.12.02.2019 व दि.31.05.2021 अन्वये आवश्यक प्रमाणपत्र /कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.
33. भरतीसाठी उपस्थित रहाण्यापुर्वी उमेदवारांनी पदाच्या अर्हता व अटी पूर्ण करीत असल्याची खातरजमा करावी उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निर्देशनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल, नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल.
34. शासन निर्णय क्र. दिव्यांग 2018/प्र.क्र. 114/16 अ दि.29.05.2019 मधील तरतुदीनुसार दिव्यांगासाठी आरक्षित असलेली पदे भरण्यात येतील.

**<u>विशेष सूचना:-</u>**

1. यापूर्वी संबंधित कार्यालयात वा अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज लिहीणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.
2. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.
3. मध्यस्थ/ठक/मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याचे आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.
4. प्रशासकीय किंवा अन्य काराणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यांवर थांबविण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.
5. सेवायोजनेत कार्यालये/प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार अर्ज करावा व आवश्यक त्या मूळ/साक्षांकित /वैयक्तिक माहितीसह त्या भरती प्रक्रियेच्या वेळी हजर राहणे आवश्यक आहे.

**सही/-**
**प्रमुख वैद्यकीय अधिक्षक व खाते प्रमुख**
**(माध्यमिक आरोग्य सेवा)**

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)

उमेदवाराने त्यांचे अलिकडे काढलेले पारपत्र आकारचे छायाचित्र लावून फोटोवर स्वाक्षरी करावी.
2.5 सें.मी. X 3 से.मी.

१. पदांचे नाव :- ---------------------------------------------------------------------------

२. अर्ज सादर करावयाचा प्रवर्ग : ---------------------------------------------

३. (अ) संपूर्ण नाव(आडनाव प्रथम) (मराठीत) : ---------------------------------------------

(इंग्रजी) : ---------------------------------------------

(ब) वडिलांचे / पतीचे संपूर्ण नांव : ---------------------------------------------

(क) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव(महिलांकरिता) : ---------------------------------------------

(इंग्रजी) : ---------------------------------------------

४. पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता : ---------------------------------------------

---------------------------------------------

मोबाईक क्र. -------------------- ई-मेल ----------------------------------------

५. लिंग : पुरुष ☐ : स्त्री ☐

६. अ) जात --------------------- पोटजात --------------- प्रवर्ग : ------------------

ब) जात वैधता प्रमाणपत्र : आहे / नाही

७. उमेदवार अपंग असल्यास अपंगत्वाचा प्रकार:

a) B (Blind) अंध :- ☐

LV (Low Vision) अल्पदृष्टी :- ☐

८. स्त्री उमेदवार महिला आरक्षणांतर्गत भरतीसाठी उपस्थित राहु इच्छित आहे का ?: होय / नाही

९. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य प्रवर्गातील उमेदवार तसेच महिला आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी ते उन्नत आणि प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे नवीनतम प्रमाणपत्र सोबत जोडले आहे का ? :

होय / नाही

असल्यास क्रमांक व दिनांक - ...................................................................

अ) जन्मदिनांक : दिनांक महिना वर्ष

| दिनांक | | महिना | | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

ब) दि.28.12.2022 रोजी असलेले वय ..........वर्षे ....... महिने ...... दिवस

११. * शैक्षणिक अर्हता :-

| शैक्षणिक अर्हता | शालांत परिक्षा / मंडळ/ विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | टक्केवारी | उत्तीर्णतेचे प्रयत्न | एस.एस.सी. / एच.एस.सी. परिक्षेतील मराठी विषयातील गुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | | | मराठी विषयातील प्राप्त गुण | पैकी |
| एस.एस.सी. | | | | | | | |
| एच.एस.सी. . | | | | | | | |
| B.Sc. (PT) (बी.एस.सी. (भौतिकोपचारतज्ञ)) / B.P.Th. (बॅचलर ऑफ फीजीओथेरपी) पदवी परीक्षेचे गुण | | | | | | | |
| महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, यांचा नोंदणी क्रमांक -......... नुतनीकरण दिनांक- ........ | | | | | | | |

१२. संगणकविषयक ज्ञान : MS-CIT किंवा शासनाने विहित : आहे/नाही
केलेल्या संगणकविषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र

१३. अनुभव : ———————————————————————————-

१४.स्थानिक पोलिस ठाण्याचा संपूर्ण पत्ता. ——————————————————-
——————————————————-

१५. सेवायोजन कार्यालयाचे नोंदणीपत्र असल्यास ——————————————————-
त्याचा क्रमांक व दिनांक, नुतनीकरणाचा दिनांक ——————————————————-

१६.अ)उमेदवारांस पुर्वी शिक्षा झाली होती का ? ——————————————————-

ब) शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशील ——————————————————
नमूद करण्यात यावा व न्यायालयीन ——————————————————
निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.

१७.अ) उमेदवारांविरुध्द पोलिस चौकशी/ ——————————————————-
न्यायालयीन प्रकरण प्रलंबित वा प्रस्तावित आहे का?

ब) असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा? ——————————————————

१८.अ)सध्या अर्जदार इतरत्र नोकरीस आहे का? ——————————————————-

ब) असल्यास, त्याबाबतचा तपशील देऊन ——————————————————-
सध्याच्या नियोक्त्याचे ना-हरकत प्रमाणपत्र जोडावे.

१९. उंची........ फूट.......इंच. वजन.........कि.ग्रॅम. शरीराची ठेवण : किरकोळ / मध्यम /सुदृढ
वर्ण ............ नेत्र वर्ण ........... वैयक्तिक खूण - ......................

मी या अन्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्या पैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास तसेच उपरोक्त माहितीच्या आधारे नियुक्ती झाली असल्यास, सेवेतून कमी केल्यास त्याबाबत माझी काही तक्रार राहाणार नाही. अर्जाव्दारे दिलेली माहिती खोटी आढळल्यास बृहंन्मुंबई महानगरपालिका माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाई करु शकते याची मला जाणीव आहे.

आपला/ आपली विश्वासू,

दिनांक : अर्जदाराची सही/-

ठिकाण : (अर्जदाराचे नाव)

## 'कनिष्ठ भौतिकोपचार तज्ञ / भौतिकोपचार तज्ञ' पदाकरिता
## अर्जा सोबत आवश्यक असलेल्या
## साक्षांकित प्रमाणपत्रांची / गुणपत्रिकांची क्रमवार यादी.

1. शाळा सोडल्याचा दाखला / जन्म प्रमाणपत्र
2. नावात बदल असल्यास शासनाच्या राजपत्राची प्रत
3. विवाहीत महिला उमेदवारांच्या बाबतीत, नावातील बदलाबाबत, विवाह नोंदणी प्रमाणपत्र अथवा शासनाच्या राजपत्राची प्रत
4. एस.एस.सी. प्रमाणपत्र / गुणपत्रीका
5. एच.एस.सी. प्रमाणपत्र / गुणपत्रीका
6. मान्यताप्राप्त विद्यापीठाची B.Sc. (PT) (बी.एस.सी. (भौतिकोपचारतज्ञ)) / B.P.Th. (बॅचलर ऑफ फीजीओथेरपी) **<u>प्रमाणपत्र व सर्व वर्षाच्या गुणपत्रीका</u>**
7. महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, मुंबई येथे नोंदणीकृत असल्याबाबतचे प्रमाणपत्र
8. जात प्रमाणपत्र (Caste Certificate)
9. जात वैधता प्रमाणपत्र (Cast Validity Certificate)
10. एम.एस.सी.आय.टी. (MS CIT) /शासन मान्य संगणक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र / गुणपत्रिका
11. महिला आरक्षणांतर्गत खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी ते प्रगत आणि उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे नविनत्तम प्रमाणपत्र भरतीच्या वेळेत अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
12. अजा, अज वगळता सर्व मागास वर्गीय उमदेवारांना ते **उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिका-याचे नविनत्तम प्रमाणपत्र** भरतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.
13. अपंग आरक्षणांकरीता (४० % अपंगत्वाचे प्रमाणपत्र)

**उपरोक्त प्रमाणपत्रांच्या / गुणपत्रीकांच्या मूळ प्रती पडताळणीच्या वेळी सोबत आणाव्यात व साक्षांकित प्रती अर्जा सोबत जोडाव्यात.**

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ नुसार
अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना

प्रतिज्ञापत्र

नमुना- अ

(नियम ४ पहा)

मी. श्री./श्रीम./कुमारी ....................................................................................
श्री. .......................................यांचा / यांची मुलगा / मुलगी /पत्नी, वय .......... वर्षे,
राहणार, ......................................................................................................................................
..........................................................................................

याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

१. मी. ....................................... या पदासाठी अर्ज दाखल केला आहे.

२. आज रोजी मला ................ (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दि.२८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ................. आहे.

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची माला जाणीव आहे.

ठिकाण -

दिनांक - उमेदवाराची स्वाक्षरी.

**प्रपत्र - अ**

स्वयंघोषणापत्र

| अर्जदाराचा फोटो |
|---|

मी ..........................................श्री. ............................ यांचा मुलगा / मुलगी वय ...............वर्ष, आधार क्रमांक (असल्यास).........................व्यवसाय................ राहणारा ..................याव्दारे घोषित करतो / करते की, वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तीगत माहिती व समजूतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिती अन्वये आणि / किंवा संबंधित कायदयानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण - अर्जदाराची सही .....................

दिनांक - अर्जदाराचे नाव .....................

**प्रपत्र - ब**

## स्वयं-साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र

अर्जदाराचा फोटो

मी ...........................................श्री. ............................ यांचा मुलगा / मुलगी वय ..............वर्ष, आधार क्रमांक (असल्यास)..........................व्यवसाय................ राहणारा ..................याव्दारे घोषित करतो / करते की, मी स्वयं साक्षंकीत केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्या सत्य प्रती आहेत. त्या खोटया असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहिती आणि / किंवा संबंधित कायदयानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण - अर्जदाराची सही .....................

दिनांक - अर्जदाराचे नाव .....................